महापारेषण कंपनीच्या ०५ प्रकल्पा अंतर्गत नवीन पारेषण वाहिन्या उभारण्यासाठी भारतीय विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६८ अन्वये शासनाची पूर्व परवानगी देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-२०२६/प्र.क्र.३०३/ऊर्जा-४,
उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ०४ ऑगस्ट, २०२६

संदर्भ :

१) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महापारेषण यांचे पत्र क्र. मराविपाकंमर्या/सां.का./प्र.योजना/योजना-१/कलम-६८/५०३१, दि.१८.०६.२०२६.
२) संचालक (प्रकल्प), महापारेषण यांचे पत्र क्र. मराविपाकंमर्या/सां.का./प्र.योजना/योजना-१/कलम-६८/४४६४, दि.०३.०६.२०२६.
३) संचालक (प्रकल्प), महापारेषण यांचे पत्र क्र.मराविपाकंमर्या/सां.का./प्र.योजना/योजना-१/कलम-६८/४४६५, दि.०३.०६.२०२६.
४) संचालक (प्रकल्प), महापारेषण यांचे पत्र क्र.मराविपाकंमर्या/सां.का./प्र.योजना/योजना-१/कलम-६८/४४६६, दि.०३.०६.२०२६.
५) संचालक (प्रकल्प), महापारेषण यांचे पत्र क्र.मराविपाकंमर्या/सां.का./प्र.योजना/योजना-१/कलम-६८/४४६७, दि.०३.०६.२०२६.
६) संचालक (प्रकल्प), महापारेषण यांचे पत्र क्र.मराविपाकंमर्या/सां.का./प्र.योजना/योजना-१/कलम-६८/४४६८, दि.०३.०६.२०२६.

प्रस्तावना :-

राज्यातील पारेषण वाहिन्यांचे सक्षमीकरण करुन राज्याला सुरळीत वीज पुरवठा होण्यासाठी संचालक (प्रकल्प), महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्या., मुंबई यांनी एकूण ०५ नवीन पारेषण प्रकल्पांच्या वाहिन्या उभारणीचे काम प्रस्तावित केले असून, त्यास भारतीय विद्युत अधिनियम, २००३ अंतर्गत कलम ६८ अन्वये पूर्व परवानगी प्रदान करण्याची विनंती शासनास प्राप्त झाली आहे. त्यानुषंगाने सदर प्रस्तावास पूर्व परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महापारेषण कंपनीकडून राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये सोबत जोडलेल्या परिशिष्ट- अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे एकूण ०५ पारेषण प्रकल्पांच्या वाहिन्या उभारणीसाठी भारतीय विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६८ अन्वये खालील अटी आणि शर्तीच्या अधीन राहून शासनाची पूर्व परवानगी देण्यात येत आहे :-

१. प्रस्तुत ०५ पारेषण वाहिन्यांच्या उभारणीचे काम महापारेषण कंपनी स्वखर्चाने, विहित केलेल्या प्रमाणित पध्दतीने आणि तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली व पर्यवेक्षणाखाली करेल.
२. वीज वाहिन्यांचे संचलन व व्यवस्थापन महापारेषण कंपनी स्वत: करेल.

३. वीज वाहिन्यांचा वापर महापारेषण कंपनीने ज्या प्रयोजनार्थ करावयाचा ठरविलेला आहे, केवळ त्याच प्रयोजनासाठी करणे कंपनीवर बंधनकारक राहील.

४. वीज वाहिन्या कार्यान्वित करण्यापूर्वी / प्रभारित करण्यापूर्वी त्यासाठी सक्षम प्राधिकरणाकडून पूर्व परवानगी घेणे अनिवार्य असेल.

५. वीज वाहिन्या उभारताना वा उभारल्यानंतर संबंधित जागा मालकाच्या/ शेतकऱ्यांच्या काही तक्रारी असल्यास, सक्षम प्राधिकाऱ्या समवेत विचारविनिमय करुन, त्या तक्रारींचे यथायोग्यरित्या निराकरण करणे ही जबाबदारी महापारेषण कंपनीची असेल.

६. सदर वीज वाहिन्या उभारणे किंवा यानुषंगाने आवश्यक असलेले सर्व परवाने मिळविणे, विहित केलेल्या निकषांची पूर्तता करणे तसेच शासनाचे विहित प्राधिकरण / विभाग / वीज नियामक आयोग इत्यादींचे इतर प्रचलित नियम त्याचप्रमाणे शासनाने वेळोवेळी विहित केलेले नियम व अटी कंपनीवर बंधनकारक राहतील.

२. विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६८ मधील अटी व शर्ती व त्यामध्ये वेळोवेळी होणारे बदल, या विभागाचा शासन निर्णय क्र.पावामो-२०२१/प्र.क्र.१७० (भाग-१)/ऊर्जा-४, दि.०२.११.२०२२ व दि.०१.१२.२०२२ मधील अटी व शर्ती तसेच राज्य शासन व केंद्र शासनाची अशा पारेषण वाहिन्यासंबंधीची वेळोवेळी जाहीर झालेली / होणारी मार्गदर्शक तत्वे व धोरणे, सदर पारेषण वाहिंन्यास लागू राहतील.

३. उक्त अटी व शर्तीचा भंग केल्याची बाब शासनाच्या निर्दशनास आल्यास सदर मान्यता रद्द समजण्यात येईल.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२६०८०४१७०६५९८८५३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NITIN BHAGWAN SURVE

Digitally signed by NITIN BHAGWAN SURVE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRIES ENERGY AND LABOUR,
2.5.4.20=BC82538EECB9538E00F76D0BE3B13050503FC13C8F2F380F15EC8BB20D4D9E79, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=6A3C8B7B9BFDA7274C3A26715E841EE7E5760FA3B4D3AB6D9F4466E893219110, cn=NITIN BHAGWAN SURVE
Date: 2026.08.04 17:07:55 +05'30'

(नि.भ.सुर्वे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क व क्रीडा) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. मंत्री (अपारंपारीक ऊर्जा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा. राज्यमंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
८) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) अपर मुख्य सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्या. प्रकाशगंगा, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई.
१२) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई.
१३) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्या, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई.
१४) निवडनस्ती (ऊर्जा-४).

****

परिशिष्ट-अ

महापारेषण कंपनीने त्यांच्या योजने अंतर्गत मंजूर केलेले एकूण ०५ प्रकल्पांची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे:-

अ. क्र.	योजनेचा तपशील	कामाचा तपशील	मान्यता आदेश क्रमांक व दिनांक
१	१३२/३३ के.व्ही. पंचवटी (मेरी), तालुका व जिल्हा नाशिक येथे उपकेंद्र उभारणे.	१३२ के.व्ही. म्हसरुल ते प्रस्तावित १३२ के.व्ही. पचंवटी (मेरी) उपकेंद्र व्दिपथ मनोऱ्यांवर ४.३२२ कि.मी. व्दिपथ वाहिनी खालीलप्रमाणे उभारणे. अ) १३२ के.व्ही. व्दिपथ मोनोपोल मनोऱ्यांवर व्दिपथ वाहिनी उभारणे -३.५३ कि.मी. ब) भूमिगत केबल (१००० वर्गमीटर) उभारणे- ०.७९२ कि.मी. १३२ के.व्ही. हरंगुळ-चाकुर वाहिनीला लिलो करुन प्रस्तावित १३२ के.व्ही. अजनी उपकेंद्रासाठी १३२ के.व्ही. वाहिनी उभारणे-१२ कि.मी.	१) संचालक मंडळ ठराव क्र. १७६/१०, दि.२६.०९.२०२५. २) मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांचे पत्र क्र. ८८८, दि.२८.११.२०२५. अंदाजित किंमत रु.१४४.५५ कोटी.
२.	१३२ के.व्ही. म्हसरुल उपकेंद्रांचे २२० (GIS)/१३२ (AIS) /३३ के.व्ही. उपकेंद्रात श्रेणीवर्धन करणे.	(अ) ४०० के.व्ही. पिंपळगाव (सारोळे) उपकेंद्र ते नियोजित २२०/१३२ के.व्ही. म्हसरुल उपकेंद्र पर्यंत २२० के.व्ही. व्दिपथ वाहिनी उभारणे - ४९.७२५ कि.मी. (ब) १३२ के.व्ही. अडगांव-रेमंड एकपथ वाहिनीला लिलो करुन व्दिपथ मनोऱ्यांवर HPC (High Performance Conductor) वापरुन व्दिपथ वाहिनी उभारणे-२.८२५ कि.मी.	१) संचालक मंडळ ठराव क्र. १७७/०४, दि.०९.१०.२०२५. २)मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांचे पत्र क्र.८८७, दि.२८.११.२०२५. अंदाजित किंमत रु.३२६.७२ कोटी.
३.	विल्होळी, ता.व जि.नाशिक येथे २२०/३३ के.व्ही. GIS उपकेंद्र उभारणे.	२२० के.व्ही. नाशिक (OCR) ते २२० के.व्ही. रेमंड एकपथ वाहिनीला प्रस्तावित २२०/३३ के.व्ही. विल्होळी GIS उपकेंद्रासाठी २२० के.व्ही. व्दिपथ मनोऱ्यांवर व्दिपथ वाहिनी उभारणे - १.९७८ कि.मी.	संचालक मंडळ ठराव क्र.१७७/०५, दि.०९.१०.२०२५. २) मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांचे पत्र क्र.८९०, दि.२८.११.२०२५. अंदाजित किंमत रु.९५.८५ कोटी.
४.	महापारेषणच्या सुरक्षा स्मार्ट सिटी GIS ता.वसई, जि.पालघर येथे २२०/२२	२२० के.व्ही. कांबा-वसई लाईनवर नियोजित सुरक्षा स्मार्ट सिटी उपकेंद्रासाठी लिलो करणे- ०.३६५	१) संचालक मंडळ ठराव क्र.१७०/५०, दि.१७.०१.२०२५.

	के.व्ही., उपकेंद्र उभारणे.	कि.मी.	२)मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांचे पत्र क्र.७९६, दि.१७.१०.२०२५. अंदाजित किंमत रु.१४०.३८ कोटी.
५.	कढोळी, ता.कामटी, जि.नागपूर येथे २२०/३३ के.व्ही. उपकेंद्र उभारणे.	२२० के.व्ही. कन्हान-उमरेड व्दिपथ वाहिनीच्या दोन्ही पथाना लिलो करुन २२० के.व्ही. कढोळी उपकेंद्रासाठी वाहिनी उभारणे- १.५ कि.मी.	१) संचालक मंडळ ठराव क्र.१७३/१६, दि.०५.०५.२०२५. २) मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांचे पत्र क्र.९३७, दि.१२.१२.२०२५ अंदाजित किंमत रु.९३.३७ कोटी.

****